# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून तीन दिवसांचा विशेष कार्यक्रम सुरू होत आहे. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा झाली होती, परंतु तिथीनुसार आजपासून हा उत्सव साजरा केला जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज अयोध्येत रामलल्लांच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त सर्व देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. अयोध्येतील मंदिर शतकानुशतके त्याग, तपस्या आणि संघर्षानंतर बांधले गेले आहे, असे पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे. त्यांनी हे मंदीर आपल्या संस्कृतीचा आणि अध्यात्माचा एक महान वारसा आहे असे म्हटले. विकसित भारताच्या संकल्पाच्या पूर्ततेसाठी हे दिव्य आणि भव्य राम मंदिर प्रेरणास्थान बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

****

“अंमली पदार्थांची तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा” या विषयावर आज नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. या परिषदेत आठ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे राज्यपाल, उपराज्यपाल, मुख्यमंत्री तसंच विविध संस्थांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शाह यांच्या हस्ते यावेळी अंमली पदार्थ निर्मुलन पंधरवड्याचा शुभारंभ तसंच मानस-२ या ऑनलाईन मदत कक्षाचे उद्धघाटनही करण्यात आलं.

****

श्री तुळजाभवानी देवी तीर्थक्षेत्रासाठी दोन हजार १०० कोटी रुपयांचा अंतिम विकास आराखडा काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आल्याची माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली. या विकास

आराखड्यात भूसंपादनासाठी निधीची तरतूद, मुख्य दर्शन मंडप, भाविक सुविधा केंद्र, प्रवेशद्वारावरील आकर्षक कमान, आधुनिक उद्यान, वृद्ध आणि दिव्यांगाकरिता सोयी सुविधा या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. राज्यशासनानं यासाठी एक हजार ३२८ कोटी रुपयांचा निधी मंत्रिमंडळ बैठकीत जाहीर केला होता.

****

नायलॉन मांजाच्या उत्पादनावर बंदी आणत राज्यात ज्या ठिकाणांहून मांजा विक्री केली जात आहे, अशा ठिकाणी कडक कारवाई करण्यात यावी अशा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी दिल्या. काल त्यांनी मुंबई, ठाणे, नाशिक,जळगांव, धुळे, पुणे, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका क्षेत्रातील नायलॉन मांजा उपयोगावरील प्रतिबंधात्मक कारवाईबाबत दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक घेतली. यावेळी गोऱ्हे यांनी नायलॉन मांजाच्या उपयोगाबाबत जनजागृती करण्याचे निर्देश दिले.

****

अहिल्यानगर इथल्या भंडारदारा प्रकल्पातून उन्हाळ्याचे तीन आणि रब्बीचे एक आवर्तन देण्याचा निर्णय जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतला आहे. यासंदर्भात काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. निळवंडे कालव्यांना १५ जानेवारी पासून पाणी देण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

****

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर पर्यंत प्रसिद्ध झालेल्या लेखन, छायाचित्रे, वृत्तकथा यांच्या प्रवेशिका ३१ जानेवारी पर्यंत  मागवण्यात येत आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर परिमंडळात वीज ग्राहकांना सर्वोत्कृष्ट सेवा देऊन वीजबिलांची शंभर टक्के वसुली करावी, असे निर्देश महावितरणचे संचालक अरविंद भादिकर यांनी दिले आहे. काल याबाबत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. ग्राहकांच्या तक्रारी सोडवणे तसंच ग्राहकांसाठी असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याच्या सुचनाही भादिकर यांनी दिल्या.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या वतीनं तीन दिवसीय सिद्धा महोत्सवाला आजपासून सुरूवात झाली. उमेद स्वयंसहायता समूहातील महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तू इथं उपलब्ध असतील. नागरिकांनी या महोत्सवाला भेट देण्याचं आवाहन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे यांनी केलं आहे.

****

बीड इथं उद्या राष्ट्रीय युवा दिन, राजमाता जिजाऊ जयंती तसेच स्वामी विवेकानंद जयंती निमित्त विविध सामाजिक संघटनांच्या वतीनं रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. यात १५ सामाजिक संघटना सहभागी होत असून उद्या सकाळी नऊ वाजता सहयोग नगर इथं हे शिबीर होणार आहे.

****

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त नांदेड इथं श्री गुरू गोविंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उद्यापासून १६ जानेवारीपर्यंत राष्ट्रीय युवा दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. यात विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व, वादविवाद, चित्रकला, क्रीडा स्पर्धांसह स्वामी विवेकानंद यांच्या जीवनचरित्रावर व्याख्यान होणार आहे. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचं आवाहन संस्थेचे प्राचार्य एस. व्ही सुर्यवंशी यांनी केलं आहे.

****

पुरुष हॉकी इंडिया लीगमध्ये, काल संध्याकाळी ओडिशातील राउरकेला इथं झालेल्या रोमांचक सामन्यात तमिळनाडू ड्रॅगन्सने श्राची रार बंगाल टायगर्सचा पराभव केला.

****